शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे

# विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे.

गोंदुर विमानतळ रोड, स्टेडियम जवळ, वलवाडी, धुळे.

फोन.नं. ०२५६२-२७००१०, २७००७१ रजिस्टर नं.महा./१०३६४

| प्राचार्य | चेअरमन |
|---|---|
| **डॉ.आर.बी.पवार** | **सौ.शारदा किशोर पाटील** |

जा.क्र.:- विद्याधन/ /2021-22 दिनांक :—31/03/2022

अहवाल 2021—2022

शैक्षणिक वर्ष 2021—2022 या वर्षातील कार्यक्रमा अंतर्गत प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

**दिनांक 8/07/2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे एकाने महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर आर.बी पवार यांनी स्वच्छते बद्दल माहिती दिले. 80 स्वयंसेवक उपस्थित होते.

**दिनांक 11/07/2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्यालय महाविद्यालय वलवाडी धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकेकाने जागतिक लोकसंख्या दिवस साजरा करण्यात आला या प्रसंगी प्राचार्य डॉक्टर आर.बी पवार यांनी आपले भविष्य वाचवण्यासाठी लोकसंख्या नियंत्रण करणे अतिशय गरजेचे आहे यासाठी प्रत्येकाने योगदान द्यायला हवे असे मत मांडले. कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉक्टर योगेश बोरसे यांनी लोकसंख्येच्या परिणामांबद्दल लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी हा दिवस पाहण्याचा निर्णय घेतला गेला असे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका जागृती पाटील यांनी केले यांप्रसंगी 85 विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**दिनांक 21/07/2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे येथील, राष्ट्रीय सेवा योजना एकक मार्फत आंतरराष्ट्रीय योग दिवस ऑनलाईन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.बी.पवार होते. या निम्मिताने संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदाताई पाटील, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.डॉ.योगेश बोरसे यांचे व्याख्यान व योगासने यांची प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. योगासनांचे प्रात्यक्षिक त्यांची करण्याची योग्य पध्दत त्यांचे फायदे याविषयी प्राचार्य डॉ. आर.बी.पवार यांनी सविस्तर

मार्गदर्शन केले सदर कार्यक्रमास एकूण 54 विद्यार्थी व विद्यार्थीनी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ.योगेश बोरसे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.जागृती पाटील यांनी परिश्रम घेतले.

**दिनांक 04/08/2021**

राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन

राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा सौ साधनाताई पाटील यांच्या हस्ते करण्यात आले त्या प्रसंगी बोलताना त्यांनी स्वयंसेवकांनी शिस्त असली पाहिजे असे सांगितले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य आर बी पवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी सेवा योजनेची सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी 85 स्वयंसेवक उपस्थित होते

**दिनांक 08/08/2021**

राष्ट्रीय स्वच्छता मिशन अभियान अंतर्गत विद्याधन महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. प्रामुख्याने महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी स्वच्छता मिशन चे महत्त्व विद्यार्थ्यांना व इंदिरानगर परिसरातील जनतेला पटवून दिले. तसेच डॉ. बोरसे यांनी आरोग्याविषयी काळजी व आरोग्य दूता मार्फत मिळणाऱ्या आरोग्य संधींची माहिती दिली. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी देखील महाविद्यालयाचा परिसर इंदिरा नगर, गौतम नगर, देठणकर नगर भागात स्वच्छता व स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. तसेच प्राचार्य डॉ. आर. बी. पवार यांनी स्वच्छतेविषयी जागृती निर्माण व्हावी म्हणून covid-19 अथवा कोरोना मुळे आपल्या देशाची परिस्थिती किती बिकट झाली आहे हे तुम्हाला चांगले माहीत आहे. त्यांच्या मुळे बरेच कुटुंब उद्ध्वस्त झाले आहेत सदर परिस्थितीमुळे आपले देखील व्यक्तीच्या खूप नुकसान झाले आहे स्वच्छता अभियानात संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर के. बी. पाटील, संस्थेचे सचिव श्री हर्षल पाटील, प्राध्यापिका सोनाली मोरे, श्री नितीन पाटील, तुकाराम पाटील तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग घेतला.

**दिनांक 09/08/2021**

## विद्याधन महाविद्यालयात क्रांती दिन आदिवासी गौरव दिन

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे. येथे विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना मार्फत क्रांती विचारांच्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. योगेश बोरसे असे म्हणाले की, क्रांतिवीरांनी आपल्या देशासाठी जे बलिदान दिले आहे ते कायम स्मरणात राहील असे आहे. त्यांनी प्राणाची पर्वा न करता शत्रूशी मुकाबला करून अहोरात्र दऱ्याखोऱ्यातून लपून छपून संकटे पार करून आपल्या साठी बलिदान दिले. म्हणून आज आपण सुरक्षित व गुलामगिरी मुक्त झालेले आहोत. तसेच आदिवासीचा विकास व्हावा व

त्यांना कुठल्याही सोयी नसताना मिळेल त्या अन्नावर म्हणजे कंदमुळे वनस्पती च्या स्वरुपात खाऊन उदरनिर्वाह केला. त्याची दखल घेत शासनाने अन्न शिजवण्यासाठी विविध योजनेमार्फत साहित्य पुरवले परंतु अद्यापि खरा आदिवासी त्यापासून वंचित आहे. माझ्यामते आजही त्याची मुले शिक्षणापासून वंचित आहेत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले तर आपण साजरा करीत असलेले आदिवासी गौरव दिन साजरा केल्याचे समाधान होईल. सदर कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ. आर.बी पवार, श्री हर्षल पाटील सचिव डॉ. योगेश बोरसे, प्राध्यापक जागृती पाटील प्राध्यापक ललिता निकम प्राध्यापक सोनाली मोरे उपस्थित होते.

**दिनांक 14 / 08 / 2021**

15 ऑगस्ट स्वतंत्रदिवस साजरा करण्यासाठी 14 ऑगस्ट रोजी महाविद्यालयीन परीसराची स्वच्छता करण्यात आली. व त्यानंतर ध्वजा भोवती रांगोळी काढण्यात आली सदर कार्यक्रमासाठी कोवीड 19 चे पालन करुन 44 विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

**दिनांक 18/08/2021**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या एका तर फळे वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात आला याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. के बी पाटील यांनी पर्यावरण समतोल राखण्यासाठी जंगल करणे गरजेचे आहे अलीकडच्या काळात जंगल निर्मिती शक्य नसले तरी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करता येते त्यातून दुष्काळावर मात करणे शक्य आहे असे मत मांडले. अध्यक्षस्थानावरून प्राचार्य डॉ. आर बी पवार यांनी बोलताना महाराष्ट्र सुजलाम सुफलाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे गरजेचे आहे झाड हे आपल्या निसर्गाचा महत्त्वाचा घटक आहे वृक्ष आपल्या निसर्गाची शोभा वाढवतात पर्यावरणला निसर्गाला झाडांमुळे सौंदर्य प्राप्त होते वृक्ष आपल्या जीवनात सर्व गोष्टी देतात आपण जर बारकाईने लक्ष दिले असता आपल्याला लक्षात येईल असे मत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी केले याप्रसंगी 80 विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते

**दिनांक 20 / 08 / 2021**

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचा जयंती दिवस सद्भावना दिनानिमित्त 20 ऑगस्ट ते 5 सप्टेंबर या कालावधीत सामाजिक ऐक्य पंधरवडा निमित्त ऑनलाइन वेबिनार राबविण्यात आले या प्रसंगी प्राचार्य डॉ. लिलावती देवरे मॅडम यांनी विविध प्रदेशातील अनेक धर्माच्या व अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये एकमेकांविषयी एकतेची भावना सौहार्द भाव वृद्धीगत करणे व हिंसाचार टाळणे ही प्रमुख उद्दिष्टे याप्रसंगी सांगितले. संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदा ताई पाटील यांनी माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी विकसित भारताचे स्वप्न देशाला कसे दाखविले हे सांगितले. तसेच संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ.के. बी. पाटील यांनी इतराप्रती चांगली भावना हित याची कामना करा असा हा दिवस आहे असे सांगितले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा दिली.प्राचार्य डॉ. ए. एस.

बागुल, प्राचार्य डॉ. आर. बी पवार, संस्थेचे सचिव श्री हर्षल पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रा. पी.एफ.पाटील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. योगेश बोरसे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. जागृती पाटील उपस्थित होते. याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेश्वरी खंडेराय, आभार प्रा. नेहा अग्रवाल यांनी केले. याकार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

**दिनांक 24/08/2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिवस साधना करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. बी. पवार होते आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात राष्ट्रीय सेवेसाठी भरून घेतले पाहिजे आजच्या covid-19 परिस्थितीही विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा करत राहायचे आहे. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या महिला कार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका जागृती पाटील यांनी महाविद्यालयीन जीवनात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले आपल्या भाषणात म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेचे उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम राष्ट्रीय एकात्मता सर्व धर्म समभाव सहिष्णुता सामाजिक बांधिलकी निर्माण करतात व त्यामधूनच विद्यार्थ्यांचे आर्थिक सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक विकास होत असतो असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. योगेश बोरसे यांनी क्लासिक मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात स्थापना बोधवाक्य व बोधचिन्ह यावर मार्गदर्शन केले कार्यक्रमाला एकूण 85 विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**दिनांक 30 / 08 / 2021**

# वसुंधरा दिवस साजरा

विद्याधन महाविद्यालयात वसुंधरा दिवस म्हणून ऑनलाईन वेबिनार राबविण्यात आले. पृथ्वी साठी जे जे चांगले करता येईल ते सारे करा वसुंधरा दिवस कधी येईल याची वाट पाहण्याची आवश्यकता नाही प्रत्येक दिवस हा वसुंधरा दिवस असतो. आपल्या भवितव्याची अधिक चांगली बांधणी करण्यासाठी संपूर्ण वर्षभर सर्वांनीच पर्यावरण रक्षणासाठी वचनबद्ध राहिले पाहिजे असे मत प्राचार्य डॉ. ए. एस. बागुल यांनी मांडले. वसुंधरा दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अनेक संधी आहेत. यासाठी आपण स्वयंसेवक बना महोत्सवात सहभागी व्हा आपल्या घरांच्या छपरांवर सौर पॅनल ची उभारणी करा, सार्वजनिक बगीच्या तयार करा असे सामाजिक कार्यक्रमांची आखणी करा. असे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. के.बी. पाटील सांगितले. माझी वसुंधरा ची शपथ राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला कार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका जागृती पाटील यांनी दिली. कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदा पाटील, संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. के.बी. पाटील, प्राचार्य डॉ. आर.बी.पवार संस्थेचे सचिव श्री.हर्षल पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक 04 / 09 / 2021**

विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत फ्रीडम रन कार्यक्रमांतर्गत फ्रीडम फ्रीडम वॉक करताना विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

**दिनांक 05/09/2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथे 5 सप्टेंबर शिक्षक दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे डॉ. नानासाहेब पाटील यांनी संबंधित प्राध्यापकांना व उपस्थित यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जीवन पट अगदी विस्तृत स्वरूपात विशद केला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे शिक्षक दिवशी असलेले प्रेम व शिक्षकांनी केलेले समाजातील उत्तम कार्य तसेच शिक्षक प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या पटीने समाज घडविण्याचे काम करत असतो. त्याच्या प्रती आपण त्यांचे झालेले कार्य स्मरणात ठेवून प्रत्येकाने आज आजच्या दिवसापासून उताराही व्हावे ही त्यांना आजच्या शिक्षक टीम सार्थकी लागेल. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. के. बी.पाटील यांनी म्हटले की डॉ.राधाकृष्णन यांनी तत्वज्ञान ते तंत्रज्ञान असे अभ्यासपूर्वक कार्य केले आणि आजही त्यांची कीर्ती त्याच मार्गाने जिवंत आहे तेच तंत्रज्ञान आज आपण सर्वांनी विकसित करणे गरजेचे आहे. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. योगेश बोरसे यांनी केले प्राचार्य डॉ. आर बी पवार यांनी मार्गदर्शन केले उपरोक्त कार्यक्रमास उपस्थित डॉ. डि.के भामरे संस्थेचे सचिव हर्षल पाटील, प्रा. जागृती पाटील, प्रा. प्रदीप पाटील, प्रा. सोनाली मोरे तुकाराम पाटील, नितीन पाटील, निशा ठाकूर

**दिनांक 09/09/2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्यार्थ्यांना विद्यालय वलवाडी धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या एका तर्फे राष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर आर बी पवार यांनी लोकांना ज्ञान मिळवून देणे कारण निरक्षरता अंधारा साठी आहे आणि प्रकारचा सारखे चांगले जीवन जगण्यासाठी साक्षरता खूप महत्त्वाची आहे कारण निरक्षर माणूस स्वतःला चांगला विचार करू शकत नाही मग राष्ट्राच्या विकासात त्याचे काय योगदान देईल हास खेड्यातील मुलगी मोठ्या शहरांमध्ये शिक्षणासाठी जात आहे कारण एक सुशिक्षित महिला संपूर्ण कुटुंबाला सुशिक्षित बनवू शकते शिक्षणाच्या माध्यमातून समाजात पसरलेला वाईट गोष्टी आणि अंधश्रद्धा न पासून मुक्तता मिळू शकते असे मत व्यक्त केले. अध्यक्षा सौ शारदा ताई पाटील यांनी पंधरा वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलामुलींना शिक्षण अनोपचारिक शिक्षणात ठेवले जाते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशात निरीक्षणांची संख्या खूप जास्त होते परंतु सरकारने केलेल्या शिक्षणाची संबंधित प्रयत्नांमुळे साक्षरतेचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी योगेश बोरसे यांनी केले याप्रसंगी 85 विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

**दिनांक 30/09/2021**

मिशन युवा स्वास्थ्य मोहिमेंतर्गत विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथे कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिम राबविण्यात आली. मोहिमेला विद्यार्थ्यांचा कर्मचारी यांनी उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कोरोना चा संसर्ग कमी झाल्याने देशातील बहुतांश राज्यांमध्ये निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. दुसरीकडे लसीकरणावर भर दिला जात आहे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्यामार्फत जागृती करून महाविद्यालयात लसीकरण शिबिर झाले. शिबिराचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा सौ शारदाताई पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. बी. पवार संस्थेचे सचिव हर्षल पाटील प्रशासकीय अधिकारी प्रा. पी. एफ. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.योगेश बोरसे, महिला कार्यक्रम अधिकारी अध्यापक जागृती पाटील, महानगरपालिकेचे डॉक्टर योगेश पाटील सिस्टर कविता काकडे आशा वर्कर अलका वाघ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते

**दिनांक 31 / 09 / 2021**

## राष्ट्रीय एकता दिवस साजरा

विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे. राष्ट्रीय सेवा योजना मार्फत लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सॊ.शारदाताई पाटील यांनी महापुरुषाचे प्रतिमेचे पूजन केले त्यांच्याबद्दलचे विचार व्यक्त केले. प्राचार्य डॉ. आर. बी. पवार यांनी त्यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. जागृती पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव हर्षल पाटील प्रशासकीय अधिकारी अधिकारी प्रा. पी. एफ. पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक 2 ऑक्टोबर 2021**

राष्ट्रीय सेवा योजना एककाने गांधी जयंती निमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी व्याख्याते प्रा. डॉक्टर उमेश पाटील यांनी अहिंसा..... जेव्हा आपण तीनशे बाबत बोलतो तेव्हा सर्वप्रथम आपल्याला बापू हे नाव आठवते महात्मा गांधी यांनी केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला अहिंसेचा अर्थ समजावून सांगितला अहिंसा ही एक व्यक्तिगत सवय असून कोणत्याही परिस्थितीत स्वतःला किंवा दुसऱ्याला नुकसान पोहोचू दिले जाऊ नये असा अर्थ आहे. अहिंसेचा मार्ग अनुसरून स्वातंत्र्य मिळवता येऊ शकते असे गांधी यांनी जगाला शिकवले असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा सौ शारदाताई पाटील यांनी महात्मा गांधी यांचा जीवन परिचय ची माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर योगेश बोरसे यांनी केले आभार प्राध्यापक जागृती पाटील यांनी केले याप्रसंगी महाविद्यालयातील स्वयंसेवक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**दिनांक 26 / 11 / 2021**

संविधान दिवस व २६/११ तील शहीदांना श्रद्धांजलीअर्पण

धुळे येथील विद्याधन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्यामार्फत संविधान दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदाताई पाटील यांनी केले. याप्रसंगी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. संविधान मूल्य बद्दल माहिती दिली. प्राचार्य डॉ. आर. बी. पवार यांनी संविधान दिवसाची माहिती दिली. प्रा. सौ. ललिता निकम यांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. तसेच २६/११ तील शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी केले कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला अधिकारी प्राध्यापिका सौ.जागृती पाटील यांनी केले. याप्रसंगी प्रा.पुनम पाटील, प्रा. सोनाली मोरे, प्रा. राजेश्वरी खंडेराय, प्रा. राजेश्री सोनवणे, प्रा. नंदिनी सोनवणे, श्री. तुकाराम पाटील, श्री. नितीन पाटील, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

**दिनांक 06 / 12 / 2021**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे येथे दिनांक 6 डिसेंबर रोजी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिवस साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सचिन नांद्रे यांनी डॉ. बाबासाहेब यांनी लिहिलेल्या संविधानाचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. के बी पाटील यांनी डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनात इतके भरीव कार्य केले आहे. ज्या दिवशी त्यांनी जगाचा निरोप घेतला त्या दिवशी सारे जग जणू अंधारमय झाले त्यादिवशी काहींनी अन्नत्याग केला त्याचे प्रति त्यांनी समाजासाठी काम केले याचा हा परिपाक साऱ्या जनतेस पहावयास मिळाला. भारत देशातील जनतेला प्रकाशाकडे नेणारा तारा विझला. त्यांनी केलेले लिखाण आज देखील समाजाला आदर्श आहे. त्यांच्या आठवणी जर प्रत्येकाने आचरणात आणल्या तर आपल्याला नक्कीच प्रेरणा मिळेल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. डॉक्टर योगेश बोरसे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला अधिकारी प्राध्यापिका जागृती पाटील यांनी केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. आर बी. पवार संस्थेचे सचिव श्री. हर्षल पाटील प्रा. डॉ. चव्हाणसर (साक्री कॉलेज) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

**दिनांक 03 / 01 / 2022**

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली

विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेच्या संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदा ताई पाटील यांनी प्रतिमेला हार अर्पण केला कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे प्रा. नितीन सोनवणे सोनगीर महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी होते. महाविद्यालयाचे प्राचार्य आर. बी. पवार संस्थेचे सचिव श्री हर्षल पाटील प्रा. अभय देवरे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. योगेश बोरसे यांनी केले.

**दिनांक 19/01/2022**

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या एकका तर्फे पर्यावरण जनजागृती या विषयावर प्राध्यापक आर एच पाटील यांनी बोलताना जागतिक वातावरणाचे रक्षण व पालनपोषण करणे ही मानवाची जबाबदारी आहे पर्यावरणीय शिक्षण यामध्ये प्रत्येकाने परणे पर्यावरणाविषयी ज्ञान समज कौशल्य जागृतता आणि वास्तविक अनुभव घेऊन स्वतःची सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केली पर्यावरणीय शिक्षण ही एक सजीव प्रक्रिया आहे आणिहे शिक्षण सर्व शालेय स्तरावर अनोपचारिक आणि अनौपचारिक स्वरूपात होईल जेणेकरून पर्यावरण विषयी एक सुसंगत आणि संतुलित दृष्टिकोन प्रत्येक मानवामध्ये निर्माण होईल असे मत व्यक्त केले. संस्थेच्या अध्यक्षा सौ शारदाताई पाटील यांनी पर्यावरण शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आपल्या देशातील पर्यावरणाची गुणवत्ता विकसित करणे व लोकांमध्ये पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धनाची भावना जागृत करणे आणि निर्माण करण्याची क्षमता विकसित करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर बी पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर योगेश बोरसे यांनी केले याप्रसंगी शिक्षक शिक्षकेतर व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते

**दिनांक 25 / 01 / 2022**

## मतदार दिवस साजरा

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाइन व ऑफलाईन मतदार नोंदणी दिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. बी. पवार यांनी विचार मांडताना मतदार हा हक्काने योग्य उमेदवाराची निवड करू शकतो तसेच समाजव्यवस्था ही चुकीची व्यक्ती निवडीने ढसाळ होते तर तिला सुस्थितीत आणून समाजाला योग्य व्यक्ती दिशा देण्यासाठी तरुण वर्गाची आवश्यकता असते. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. के. बी. पाटील सर म्हणाले की कायद्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यप्रणाली मध्ये काम करणारी यंत्रणा हवी असते त्यासाठी संविधानानुसार लोकशाही रुजली पाहिजे म्हणून प्रत्येक क्षेत्रात एक मंडळ कार्यरत असते अशावेळी नवीन विचारसरणी समाविष्ट व्हायची गरज भासली तर अठरा वर्षे पूर्ण झालेल्यांना हक्काने आपले मत नोंदविण्याची संधी मिळते. संस्थेच्या अध्यक्षा सौ. शारदाताई पाटील म्हणाल्या की आजही ग्रामीण भागात मतदान जास्त होते व शहरी भागात कमी होते म्हणजे जनता सुशिक्षित आहे परंतु जागृत नाही हे नमूद करावे असे वाटते. मतदारांना शपथ कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. योगेश बोरसे यांनी दिली. याप्रसंगी संस्थेचे सचिव हर्षल पाटील, राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी प्रा.जागृती पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक 11 / 02 / 2022**

लतादीदी मंगेशकर यांना श्रद्धांजली

विद्याधन महाविद्यालय वलवाडी धुळे येथे आज रोजी प्रसिद्ध गान सम्राज्ञी भारतरत्न स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर. बी. पवार तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक 19/02/2022**

शिवजयंती उत्साहात साजरी

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे विद्याधन महाविद्यालय धुळे येथे शिवजयंती साजरी करण्यात आली. सौ.शारदाताई पाटील यांनी शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. आदर्श राजा कसे असावे याची माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. के. बी.पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या संघटन कौशल्याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच प्राचार्य डॉ. आर. बी. पवार यांनी शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार कसा केला याची सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉक्टर योगेश बोरसे यांनी केले कार्यक्रमाचेआभार प्रदर्शन प्रा. प्रफुल्ल पवार यांनी केले याप्रसंगी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे
# विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे.
गोंदुर विमानतळ रोड, स्टेडियम जवळ, वलवाडी, धुळे.
फोन.नं. ०२५६२-२७००१०, २७००७१ रजिस्टर नं.महा./१०३६४

प्राचार्य
**डॉ.आर.बी.पवार**

चेअरमन
**सौ.शारदा किशोर पाटील**

जा.क्र.:- विद्याधन/ /2021-22 दिनांक :—06/03/2022

**ठराव क्र.1**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर दिनांक 07/03/2022 ते 13/03/2022 या कालावधीत आयोजन करण्याचे ठरले त्यासाठी विविध केटरर्स कडून निविदा मागविण्यात आल्यात

| अ.क्र. | नाव | रुपये |
|---|---|---|
| 1 | आई पेडकाई | 18900/.— |
| 2 | जय मेंढेश्वर मंडप डेकोरेटर्स | 20475/— |
| 3 | ओम शांती मंडप ॲण्ड केटरर्स | 18000/— |

ओम शांती मंडप ॲण्ड केटरर्स यांचे दर सगळयात कमी असल्यामुळे व्यवस्थापन मंडळाने व राष्ट्रीय सेवा योजनेच्या सल्लागार समितीच्या सदस्यानी ओम शांती मंडप ॲण्ड केटरर्स यांना रुपये 18000/— सात दिवसासाठी 45 विद्यार्थ्यांना चहा, अल्पोपहार, व दोन वेळेचे जेवणास मान्यता दिली.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे

# विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे.

गोंदुर विमानतळ रोड, स्टेडियम जवळ, वलवाडी, धुळे.

फोन.नं. ०२५६२-२७००१०, २७००७१ रजिस्टर नं.महा./१०३६४

प्राचार्य
**डॉ.आर.बी.पवार**

चेअरमन
**सौ.शारदा किशोर पाटील**

जा.क्र.:- विद्याधन/ /2021-22 दिनांक :–31/03/2022

प्रति,
मा संचालक सो,
राष्ट्रीय सेवा योजना,
क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव

विषय सन 2021- 22 या वर्षाचे नियमित कार्यक्रमाचे लेखा अहवाल व संबंधित कागदपत्रे स्वीकारणे बाबत

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सन 2021-2022 या वर्षाचे नियमित कार्यक्रमांचे अहवाल व संबंधित कागदपत्रे स्वीकारून सहकार्य करावे ही विनंती.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे

# विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे.

गोंदुर विमानतळ रोड, स्टेडियम जवळ, वलवाडी, धुळे.

फोन.नं. ०२५६२-२७००१०, २७००७१ रजिस्टर नं.महा./१०३६४

प्राचार्य
**डॉ.आर.बी.पवार**

चेअरमन
**सौ.शारदा किशोर पाटील**

जा.क्र.:- विद्याधन/ /2021-22 दिनांक :—31/03/2022

प्रति,
मा संचालक सो,
राष्ट्रीय सेवा योजना,
क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव

विषय सन 2021-2022 या वर्षाचे नियमित कार्यक्रमांचे लेखा अहवाल मधील हिशोब पत्रे स्वीकारणे बाबत

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सन 2021-2022 या वर्षाचे नियमित कार्यक्रमांचे लेखा अहवाल मधील हिशोब पत्रे व पाठवीत आहोत त्यात खालीलप्रमाणे येणे बाकी आहे.

मिळालेले अग्रिम 00/-
झालेला खर्च 18980/-
घेणे रक्कम 18980/-

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे
# विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे.
गोंदुर विमानतळ रोड, स्टेडियम जवळ, वलवाडी, धुळे.
फोन.नं. ०२५६२-२७००१०, २७००७१ रजिस्टर नं.महा./१०३६४

प्राचार्य
**डॉ.आर.बी.पवार**

चेअरमन
**सौ.शारदा किशोर पाटील**

जा.क्र.:- विद्याधन/ /2021-22

दिनांक :—31/03/2022

प्रति,
मा संचालक सो,
राष्ट्रीय सेवा योजना,
क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव

विषय सन 2021-2022 या वर्षाचे विशेष हिवाळी शिबिर कार्यक्रमाचे लेखा अहवाल व संबंधित कागदपत्रे स्वीकारणे बाबत

महोदय

उपरोक्त विषयानुसार आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सन 2021-2022 या वर्षाचे विशेष हिवाळी शिबीर कार्यक्रमाचे लेखा व्हाल व संबंधित कागदपत्रे स्वीकारून सहकार्य करावे ही विनंती

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे

# विद्याधन महाविद्यालय वलवाडी, धुळे.

गोंदुर विमानतळ रोड, स्टेडियम जवळ, वलवाडी, धुळे.

फोन.नं. ०२५६२-२७००१०, २७००७१ रजिस्टर नं.महा./१०३६४

प्राचार्य **डॉ.आर.बी.पवार** | चेअरमन **सौ.शारदा किशोर पाटील**

जा.क्र.:- विद्याधन/ /2021-22 | दिनांक :–06/03/2022

प्रति,
मा संचालक सो,
राष्ट्रीय सेवा योजना,
क.ब.चौ.उ.म.विद्यापीठ जळगाव

विषय सन 2021 22 या वर्षाचे विशेष हिवाळी शिबिर कार्यक्रमाचे लेखा अहवाल मधील हिशोब पत्र स्वीकारणे बाबत

महोदय

उपरोक्त विषयानुसार आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सन दोन हजार एकवीस बावीस या वर्षाचे विशेष हिवाळी शिबिर कार्यक्रमाचे लेखा अहवाल मधील हिशोब पत्र पाठवीत आहोत यात खालील प्रमाणे देणे/घेणे बाकी आहे

मिळालेली अग्रीम 00/-
झालेला खर्च 20250/-
घेणे रक्कम 20250/-